**L. A. BILL No. IX OF 2023.**

A BILL

FURTHER TO AMEND THE PANDHARPUR TEMPLES ACT, 1973.

## सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९.

**पंढरपूर मंदिरे अधिनियम, १९७३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

१९७४ चा महा. ९. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, पंढरपूर मंदिरे अधिनियम, १९७३ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, पंढरपूर मंदिरे (सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ३२अ ची सुधारणा.

**२.** पंढरपूर मंदिरे अधिनियम, १९७३ याच्या कलम ३२अ मध्ये, पोट-कलम (४) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :— १९७४ चा महा. ९.

" (५) सल्लागार परिषदेच्या नामनिर्देशित सदस्यांचा पदावधी हा, श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीवर राज्य शासनाने नियुक्त केलेल्या सदस्यांच्या पदावधीइतका असेल. ".

**उद्देश व कारणे यांचे निवेदन.**

पंढरपूर मंदिरे अधिनियम, १९७३ (१९७४ चा महा. ९) हा इतर गोष्टींबरोबर पंढरपूर येथील विठ्ठल व रुक्मिणी मंदिरात काम करणारे उपाध्ये व पुजारी वर्ग यांचे सर्व अनुवंशिक हक्क आणि विशेषाधिकार नाहीसे करणे आणि तसेच असे अधिकार व विशेषाधिकार संपादन करणे व असे अधिकार व विशेषाधिकार, त्या प्रयोजनासाठी स्थापन केलेल्या समितीकडे निहित करणे आणि त्या मंदिरांचे उत्तम प्रशासन व व्यवस्थापन करणे यांकरिता अधिनियमित केलेला आहे.

२. उक्त अधिनियमाच्या कलम ३२अ मध्ये, विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीला तिची कार्ये व कर्तव्ये अधिक प्रभावीपणे पार पाडण्याकरिता, सल्ला देणारी, विठ्ठल व रुक्मिणी देवदेवता व इतर संत यांचे धार्मिक विधी व समारंभ आणि रूढी व परंपरा यांसह विभिन्न क्षेत्रांतील विशेष ज्ञान व प्रत्यक्ष अनुभव असणाऱ्या व्यक्तींचा समावेश असणारी एक सल्लागार परिषद घटित करण्याकरिता व तिच्याशी संबंधित बाबींकरिता तरतूद केली आहे.

तथापि, या अधिनियमामध्ये सल्लागार परिषदेच्या नामनिर्देशित सदस्यांच्या पदावधीबाबत तरतूद केलेली नाही. म्हणून शासनास सल्लागार परिषदेच्या नामनिर्देशित सदस्यांचा पदावधी हा, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीवर राज्य शासनाने नियुक्त केलेल्या सदस्यांच्या पदावधीइतका असेल, अशी उक्त अधिनियमात तरतूद करणे इष्ट वाटते. उपरोक्त प्रयोजनांकरिता, पंढरपूर मंदिरे अधिनियम, १९७३ याच्या कलम ३२अ मध्ये यथोचित सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

३. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई, **देवेंद्र फडणवीस,**

दिनांक ८ मार्च, २०२३. उप मुख्यमंत्री.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९.]**

**[पंढरपूर मंदिरे अधिनियम, १९७३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. देवेंद्र फडणवीस,**
उप मुख्यमंत्री.**]**

**[विधानसभेने दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई